॥ श्रीरामा घनःश्यामा ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः पी. सावळाराम
संगीतः वसंत प्रभु

श्रीरामा घनःश्यामा, बघशिल कधी तू रे
तुझी लवांकुश बाळे? ॥ धृ. ॥

वनवासाच्या घरात माझ्या अरुण-चंद्र हे सवे जन्मता
विरह प्रीतिचे दुःखही माझे हसले रघुनाथा।
विश्वाची मी मंगलमाता तुझी लाडकी सीता
तुझ्याविना रे आनंदाला गालबोट लागले ॥ १ ॥

रूप मनोहर तुझी पाहिली यौवनातली कांती
बाळांच्या या रूपे बघते तुझ्याच चिमण्या मूर्ती।
पूर्ण पाहिले तुला राघवा परी ही दैवगती
तुझे बाल पण तुझ्या परी का वनवासी झाले? ॥ २ ॥

बघायचे जर नसेल मजला ये ना बाळांसाठी
चार करांचा कोमल विळखा पडूदे श्यामल कंठी।
ताटातुटीच्या भेटी घडता झरझरे अमृत ओठी
मिटुनी डोळे म्हणेन माझे रामायण संपले ॥ ३ ॥